# मुंबई विद्यापीठ

क्र. घ.म./ ०१ / २०१४–२०१५

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय, अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात येते की, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण–१११४/प्र.क्र.७१/विशि–३ दिनांक १९ मार्च, २०१४ अन्वये भारत निवडणूक आयोगाने पुरस्कृत केलेल्या SVEEP-II(Systematic Voter Education and Electoral Participation) कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत आदेश निर्गमित केले आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली असून सदरच्या शासन परिपत्रकाप्रमाणे महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करावी व त्याचा अहवाल ८ दिवसांत विनाविलंब विद्यापीठास सादर करावा, ही विनंती.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– ३ एप्रिल, २०१४

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय, अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :–

१. श्री गौतम जो. रसाळ, शासनाचे सहसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
२. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११ ००१.
३. मा. संचालक, तंत्र शिक्षण विभाग, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१.
४. मा. सह–संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१.
५. मा. सह–संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा – रायगड –४१० २०६.
६. सह–संचालक, तंत्र शिक्षण विभाग, खेरवाडी, बांद्रा (पू), मुंबई–४०० ०५१.
७. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
८. स्वीय सहाय्यक, प्र–कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई –४०० ०३२.
९. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई –४०० ०३२.
१०. समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, बी– रोड, मुंबई.
११. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, बी–रोड, मुंबई.
१२. स्वीय सहायक, संचालक, बीसीयुडी, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
१३. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.) विद्यानगरी कॅम्पस, सांताक्रुझ, मुंबई – ४०० ०९८.
१४. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

भारत निवडणूक आयोगाने पुरस्कृत केलेल्या SVEEP-II(Systematic Voter Education and Electoral Participation) कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण १११४/प्र.क्र.७१/विशि-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक - १९ मार्च, २०१४.

<u>प्रस्तावना-</u>

दिनांक ०६.०२.२०१४ रोजी श्री. अक्षय रौत, महासंचालक (स्वीप), भारत निवडणूक आयोग आणि मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या समवेत सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक संपन्न झाली. भारतीय लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती करुन निवडणूक प्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग जास्तीत जास्त वाढवावा या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने SVEEP (मतदारांना पध्दतशीपणे शिक्षण देणे व त्यांचा मतदानात सहभाग वाढविणे) हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. या उपक्रमामध्ये देशातील मतदार यादीत तसेच मतदान करण्याच्या प्रक्रियेत महाराष्ट्राची टक्केवारी कमी होत आहे. त्यातही शहरी विभागामध्ये हे प्रमाण एकूण महाराष्ट्राच्या ५० टक्के लोकसंख्या असूनही मतदानातील त्यांचा हिस्सा ५८ टक्केच आहे. ही टक्केवारी वाढविण्यासाठी मंत्रालयातील प्रत्येक विभागाची जबाबदारी निर्धारित करण्यात आली. त्यासाठी सर्वप्रथम प्रत्येक विभाग मतदान वाढविण्यासाठी तसेच मतदारांचा सहभाग त्यामध्ये जास्तीत जास्त होण्यासाठी काय करु शकतो, याचा बैठकीत आढावा घेण्यात आला. त्या अनुषंगाने सदरहू बैठकीत मा. महासंचालक (स्वीप) व मा. मुख्य सचिव यांनी या आदेश वजा सूचना दिलेल्या आहेत.

दिनांक ०६.०२.२०१४ रोजीच्या मा. महासंचालक (स्वीप) व मा. मुख्य सचिव यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत मा. महासंचालक (स्वीप) व मा. मुख्य सचिव यांनी दिलेल्या आदेश वजा सूचनेच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने पुरस्कृत केलेल्या SVEEP-II(Systematic Voter Education and Electoral Participation) कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत शासन परिपत्रक निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे दिनांक ०६.०२.२०१४ रोजी मा. महासंचालक (स्वीप) व मा. मुख्य सचिव यांच्यासमवेत बैठकीत झालेल्या बैठकीत मा. महासंचालक (स्वीप) व मा. मुख्य सचिव यांनी पुढीलप्रमाणे आदेश वजा सूचना दिलेल्या आहेत :-

१. उच्च शिक्षण विभागामार्फत परिपत्रक काढून सर्व विद्यापीठे व महाविद्यालये SVEEP कार्यक्रमामध्ये सहभागी होतील व जनजागृती व मतदान प्रक्रियेमध्ये लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करतील.

२. राष्ट्रीय सेवा योजना, सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थी व विद्यार्थीमंडळ या सर्वांनी मिळून शहरी विभाग व ग्रामीण विभागामध्ये लोकांना मतदान प्रक्रियेत सहभागी होईपर्यंत स्वयंसेवकाची भूमिका अधोरेखीत करावी.

३. विभागातील सर्व कर्मचाऱ्यांकडून संकल्पपत्र / प्रतिज्ञा भरुन मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात सादर करावे.

४. प्रत्येक महाविद्यालयातील सज्ञान विद्यार्थ्यांकडून (१८ वर्षे पूर्ण करणाऱ्या) स्वेच्छेने संकल्पपत्र भरुन मा. निवडणूक आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयात सादर करावे.

५. प्रत्येक महाविद्यालयातील एका विद्यार्थ्यास कॅम्पस ॲम्बॅसॅडर म्हणून नियुक्ती करण्याबाबत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळवून तात्काळ ही प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना द्याव्यात.

६. निवडणूक आयोगाकडून उपलब्ध साहित्य उदा. घोषवाक्य, बॅनर आणि पत्रके विद्यापीठांपर्यंत पाठवून त्यांच्यामार्फत महाविद्यालयांना उपलब्ध करुन द्यावेत.

७. महाविद्यालयांनी प्रतिज्ञा / संकल्पपत्र फ्लेक्स बॅनरवर लावून त्यावर सह्यांची मोहिम राबवावी.

सदर शासन परिपत्रकातील सूचनांच्या अनुषंगाने आपल्या विद्यापीठ/ संचालनालया/विभागा मार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदर बाबतीत आपल्या विद्यापीठ/संचलनालयाच्या/विभागाच्या अधिपत्याखालील संस्था/महाविद्यालये यांना वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.तसेच यासंदर्भात आपल्या विद्यापीठामार्फत/ संचालनालयामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास १५ दिवसांत सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(गौतम जो. रसाळ)
शासनाचे सहसचिव

प्रत,

१. मा. कुलपतींचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे,
३. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. विभागातील सर्व सहसचिव /उपसचिव, उ.व तं. शि. विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
६. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
७. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (विशि-३)